REGISTERED No. B. 3434




# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २७ नोव्हेंबर १९४६ अंक ४६


## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—ः शाखा ः—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—ः बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) | विश्वास (चार बैली) |
| किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) | वासुदेव (दोन बैली) |
| किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) | राजा (एक बैली) |

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# विविध माहिती

**१६ हजारांची बळी घेतलेली रेल्वे लाइन**—जपान्यांनीं युद्धकैद्यांना जुंपून बर्मा-सयाम रेल्वेचा जो माग तयार केला, तो १२½ लक्ष पौंड किंमतीस सयामी सरकार विकत घेणार आहे. ही रेल्वे लाइन तयार करीत असतांना १६००० ब्रिटिश व इतर युद्धकैदी मृत्यू पावले.

**रेल्वेरस्त्याचे " तयार " तुकडे**—लांकडाच्या ओंड्यांवर रूळ आंथरून ते आवळून टाकण्याचें काम रेल्वे लाइनवर न करतां एका स्वतंत्र डेपोंत तें करून ६० फुटी लांबीचे "तयार" तुकडे जाग्यावर आणून यारीनें ते बसविण्याचा उपक्रम इंग्लंडमधील सदर्न रेल्वेनें सुरू केला आहे. त्यामुळें खर्चांत १३½% बचत होऊन निम्म्या वेळांत काम आटपतें व वहातुकीचा खोळंबा टळतो, असा अनुभव आहे.

**श्री लक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि. भोर**—वरील कंपनीस ३० एप्रिल १९४६ अखेरच्या वर्षी ३९,७४९ रुपये (घसारा काढण्यापूर्वी) नफा झाला. कंपनीनें एकुण सुमारें ५ लक्ष रुपयांची विक्री केली. गेल्या वर्षीचा १४,००३ रुपये धरून होणाऱ्या ५३,७५३ रुपयांतून ३ लक्ष रुपयांच्या ६¼% क्यु. प्रेफरन्स भागांना ३०–४–४६ अखेर डिव्हिडंड देण्यांत येणार आहे व बाकीचा नफा पुढील सालांत ओढला जाईल. पुढील वर्षी इतर शेअर्सवरहि डिव्हिडंड देतां येईल, अशी डायरेक्टरांस उमेद आहे. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ५ लक्ष रुपयें आहे.

**युनायटेड पब्लिसिटी सिंडिकेट लि. पुणें**—जाहिरातीच्या एजन्सीचें काम करणारी ही कंपनी श्री. ना. तु. ठाकूर यांनीं नोंदविली आहे. कंपनीचें स्वरूप "प्रायव्हेट लिमिटेड" असून तिची मॅनेजिंग एजन्सी पर्सनल प्रेस-सर्व्हिसकडे आहे.

**हवेपेक्षां हलकें विमानः**—रशियांतील विमानवहातुकीसाठीं एक अतिशय हलक्या वजनाचें विमान तयार करण्यांत आलें आहे. हें विमान एकच वैमानिक चालवूं शकतो. त्याची लांबी १५० फूट असून त्यांत १० ते १२ प्रवासी बसण्याची व्यवस्था आहे. वेग ताशीं ६२ मैल आहे.

**आफ्रिकेंतील युरेनिअम अमेरिका लांबविते.**—बेल्जमच्या आफ्रिकेंतील बेल्जिअन कांगो या वसाहतींत जगांतील ज्ञात युरेनिअमच्या सांठ्यापैकीं ८० टक्के युरेनिअम आहे. युद्ध चालू असतांना अमेरिकेनें युरेनियमबद्दल बेल्जमशीं करार केला होता. आतां बेल्जमच्या पार्लमेंटमधील एका कम्युनिस्ट प्राध्यापकानें याबद्दल तक्रार केली आहे. बेल्जममधील शास्त्रीय-संशोधनासाठीं लागणारें १ किंवा २ किलोग्रॅम युरेनिअम मिळण्यासाठी मारामार पडत असतां शेंकडों टन युरेनिअम अमेरिकेला रवाना होत आहे असा आरोप त्यांनीं केला आहे.

**आपलां आहार**—पृ. सं. ५०, किं १२ आ. मुंबई सरकारच्या पुरवठा खात्यातर्फे हें पुस्तक प्रकाशित झालें आहे. आपला आहार असा असावा, अन्नाची उपयुक्तता व योग्य आहाराबाबत कांहीं विधायक सूचना वगैरे पोषणशास्त्रासंबंधीं लिहिलेले निरनिराळे लेख ह्या छोट्या पुस्तिकेंत एकत्रित करण्यांत आले आहेत. सध्याच्या अन्नतुटवड्याच्या व अन्ननियंत्रणाच्या दिवसांत यथोचित व प्रमाणशीर आहार ठेवण्याकरतां या पुस्तिकेचा चांगला उपयोग होईल. पुस्तिकेंत अनेक चित्रें, तक्ते वगैरे देऊन प्रतिपाद्य विषय आकर्षक करण्यांत आला आहे.

**न फुटणाऱ्या कांचेंत अधिक सुधारणा**—एका ब्रिटिश कारखान्यानें न फुटणारी कांच करण्यांत पूर्वीपेक्षा अधिक यश मिळविलें आहे. या नवीन कांचेचा लवचिकपणा पूर्वीच्या कांचेपेक्षा ३५० टक्क्यांनीं अधिक आहे. शिवाय ती रंगरहित असल्यानें उष्ण देशांत नेहमी पारदर्शक राहील अशी आहे.

**बोटीची पाण्याखालीं दुरुस्ती**—पाण्याखालील बोटींच्या भागांची दुरुस्ती करण्यासाठी ब्रिटिश यंत्रज्ञांनीं एक नवें यंत्र शोधून काढलें आहे. त्या यंत्रामुळें पाण्याखालील पोलाद कापतां व जोडतां येतें. पाणबुडे वापरतात तशा प्रकारच्या एका मोठ्या घंटेंत तें बसविलेलें असून त्यामुळें दुरुस्तीच्या काळांत निम्यानें बचत होईल असें म्हणतात.

**विणण्याचें नवें यंत्र**—हातमोजे, पायमोजे, फ्रांक वगैरे जलदीनें विणण्याचें एक यंत्र ब्रिटिश कारखाने मोठ्या प्रमाणावर निर्माण करीत आहेत. हल्लीं चालू असलेल्या यंत्रापेक्षा हें यंत्र दुप्पट गतीनें काम करतें. या यंत्राचा एक नमुना सध्या जग-पर्यटनावर असून, तो हिंदुस्थानांतही येणार आहे.

**नेपाळ-हिंदुस्थान-व्यापार**—नेपाळ आणि हिंदुस्थान यांच्यामधील व्यापार खाजगी व्यापाऱ्यांच्या करवीं करण्याच्या ऐवजीं प्रत्यक्ष उभय सरकारांनींच करावा अशा आशयाचें पत्र संयुक्त-प्रांत सरकारचे गृहमंत्री मि. किडवाई यांनीं, मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री बाबू राजेंद्र प्रसाद यांना लिहिलें आहे.

**हिंदी लष्कर आणि अन्नधान्य**—१९४६–४७ सालांत हिंदी लष्कराला कणीक १ लाख ३८ हजार ७०० टन, डाळी २३ हजार ५०० टन, तूप ११८०० टन लागेल असा अंदाज होता. पण आतां ही सामग्री अनुक्रमें ८४२५० टन कणीक, १५८०० टन डाळ, ८००० टन तूप इतकीच लागणार असल्यानें हिंदी अन्नाचा प्रश्न कांहींसा सोपा होईल.

**हिंदुस्थानसाठीं ईजिप्तचा कापूस**—हिंदुस्थाननें ईजिप्तकडून १ लाख ६० हजार कापसाचें गठ्ठे विकत घेतले असून, त्यापैकीं १६ हजार गांठी वाटही चालू लागल्या आहेत. ईजिप्तचा कापूस लांब धाग्याचें सूत निघण्यासाठी प्रसिद्ध आहे.

**सहकारी ट्रेनिंग क्लास**—मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें सटाणा येथील सहकारी ट्रेनिंग क्लास ७–१०–४६ ते २१–१०–४६ पर्यंत भरविण्यांत आला, त्याचा २१ उमेदवारांनीं फायदा घेतला.

## जाहीर नोटीस

कळविण्यांत येतें कीं, मे. एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर, पुणें डिव्हिजन, यांचे स्टोअर समोर हॉस्पिटलसमोरील कंपाउन्डमध्यें अजमासें ३०० डांबराचीं रिकामी टिपें ठेविलीं आहेत. त्याचा जाहीर लिलांव मे. डेप्युटी इंजिनिअर, पुणें बिल्डिंग सब डिव्हिजन, सेंट्रल ऑफिसेस, तिसरा मजला, खोली नं. ३६ येथें ता. ११ माहे डिसेंबर सन १९४६ रोजीं ४ वाजतां केला जाईल. तरी ज्यांची लिलांव घेणेची खुशी असेल त्यांनीं वर नेमल्या जागीं हजर राहून लिलांव बोलावे.

लिलांवाच्या शर्ती लिलांवाचे वेळीं जागेवर वाचून दाखविल्या जातील. ज्या कोणास टिपें पाहावयाचीं असतील, त्यांनीं सुट्टीखेरीज करून २ ते ५ चे दरम्यान वरील जागीं भेटावे म्हणजे दाखविणेची व्यावस्था करण्यांत येईल.

सेंट्रल ऑफिसेस, खोली नं. ३६, तिसरा मजला, पुणें, ता. २१।११।४६

Sd/– S. H. MEHTA,
डेप्युटी इंजिनिअर
पुणें बिल्डिंग सबडिव्हिजन.

## जाहीर नोटीस

कळविण्यांत येतें कीं, दापोडी वर्कशॉप सब डिव्हिजन कंपाऊंडमध्यें एक जुना अस्फाल्ट मिक्सर (अस्फाल्ट मिक्सिंग पॉवर प्लँट) पडलेला आहे. त्याचा जाहीर लिलांव मे. डेप्युटी इंजिनिअर पुणें बिल्डिंग सब-डिव्हिजन, सेंट्रल आफिसेस खोली नं. ३६ तिसरा मजला, येथें ता. १२ माहे डिसेंबर सन १९४६ रोजीं ४ वाजतां करण्यांत येईल. ज्यांना लिलांव बोलणेची खुषी असेल त्यांनीं वरील जागीं नेमलेल्या वेळीं हजर राहावें.

ज्या कोणास अस्फाल्ट मिक्सर पहावयाचा असेल त्यांनीं दापोडी येथें जाऊन पाहाणें.

लिलांव मंजुरी सर्वस्वी मे. सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, सेंट्रल सर्कल, पुणें यांचे अधिकारांत आहे. त्यांचा निकाल अखेरचा समजला जाईल.

सेंट्रल ऑफिसेस, खोली नं. ३६, तिसरा मजला, पुणें, ता. २१।११।४६

Sd/–S. H. MEHTA
डेप्युटी इंजिनिअर
पुणें बिल्डिंग सबडिव्हिजन.

# अर्थ

बुधवार, ता. २७ नोव्हेंबर १९४६

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.




संस्थापक

प्रो. वा. मो. काळे

## ब्रिटिश मजूर पक्षांतील वादळ

ब्रिटनमधील अधिकारारूढ मजूर पक्षांत ब्रिटिश परराष्ट्रीय धोरणासंबंधीं नुकतेंच जें वादळ झालें तें अनेक दृष्टीनें महत्त्वाचें आहे. युद्धानंतरच्या निवडणुकींत समाजवादी कार्यक्रम ब्रिटिश जनतेपुढें ठेवून हा पक्ष हुजूर-पक्षाविरुद्ध प्रचंड बहुमतानें निवडून आला. ब्रिटिश राजकारणांत मजूर पक्ष प्रबल झाल्यावर ब्रिटनच्या साम्राज्यशाही धोरणांत फरक होऊन जागतिक लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांना भरभराटीचे दिवस प्राप्त होतील अशी अपेक्षा सर्व जगांतील पुरोगामी विचाराचे लोक करीत होते. पण अधिकारस्वीकारानंतर नवे परराष्ट्रमंत्री मि. बेव्हिन यांनीं हुजूरपक्षाचेंच परराष्ट्रीय धोरण चालू ठेवलें. स्पेनमधील फ्रँकोची हुकूमशाही स्थानभ्रष्ट करण्यास नुसता आर्थिक बहिष्कार टाकण्यास सुद्धां मि. बेव्हिन तयार होत नाहींत. ग्रीसमध्यें फॅसिस्ट–विरोधी गटांना डावलून राजनिष्ठ लोकांचें प्रतिगामी सरकारच मि. चर्चिल यांनीं स्थापन केलें; आणि त्यांच्याच धोरणाची री मि. बेव्हिन यांनींही पुढें ओढली. ब्रिटनमध्यें कांहीं महिन्यां-पूर्वीं ट्रेड–युनिअन काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांतच ब्रिटिश परराष्ट्रीय धोरणाबद्दल कडक टीका झालेली होती. विशेषतः स्पेन व ग्रीसबद्दलच्या धोरणाबद्दल तीव्र असंतोष व्यक्त करण्यांत आलेला होता. याच असंतो-षानें परवां पार्लमेंटमध्यें प्रकट स्वरूप धारण करून राजेसाहेबांच्या भाष-णाची संधि साधून परराष्ट्रीय धोरणाबद्दल उपसूचना सुचविल्या. मजूर-पक्षाचें पार्लमेंटमध्यें हुकमी बहुमत असल्यामुळें या उपसूचना मंजूर होण्याची शक्यता कधींच नव्हती. परंतु या उपसूचनेवर मतें देण्याची सूचना देण्यांत आली असतांना सुद्धां १०० मजूर सभासद तटस्थ राहिले. यावरूनच मजूर पक्षांतील एका मोठ्या गटाला ब्रिटनचें सध्याचें परराष्ट्रीय धोरण मान्य नाहीं हे स्पष्ट होत आहे. मजूर–पक्षाची पार्लमेंटमधील सभा-सद–संख्या ३९० असून त्यांपैकीं जवळ जवळ एक तृतीयांश सभासदांनीं या ' बंडांत ' भाग घेतला होता. त्यामुळें मजूरपक्षांतर्गत शिस्त पुन्हा एकदां अंमलांत येणार असल्याचीही बातमी आहे.

विरोधकांचें म्हणणें असें होतें कीं, ब्रिटन अमेरिकेच्या आर्थिक पाशांत सांपडून सोव्हिएट रशिआला विरोध करीत आहे. त्यांच्या मतें ब्रिटननें अमेरिकन भांडवलशाही व सोव्हिएट कम्युनिझम यांच्यांत तेढ उत्पन्न न होऊं देण्यासारखें धोरण स्वीकारणें जरूर आहे. नाहींतर अत्यंत भयानक अशा तिसऱ्या महायुद्धांत ब्रिटनचा मात्र चेंदामेंदा होण्याचा संभव आहे. विरोधकांच्या या प्रतिपादनांतील खरा अर्थ असा आहे कीं अमेरिकेची आर्थिक शक्ति आणि सोव्हिएट रशिआचें राजकीय सामर्थ्य यांच्यापुढें ब्रिटनचा टिकाव लागणें कठीण असल्यामुळें या दोन प्रचंड देशांत सत्तेचा समतोलपणा रहाणें अगर राखणें जरूर आहे. गेल्या सप्टें-बरमध्यें अमेरिकेचे माजी व्यापारमंत्री मि. वालेस यांनीं अमेरिकन पर-राष्ट्रीय धोरणासंबंधीं जें भाषण केलें होतें, त्यांत त्यांनीं ब्रिटनच्या पर-राष्ट्रीय धोरणाला अमेरिका उचलून धरीत असून त्यामुळें तिसऱ्या महा-युद्धाचा धोका उत्पन्न होत असल्याचें सांगितलें. ब्रिटन आणि अमेरिका या दोन्ही सरकारांच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल जे अंतर्गत मतभेद आहेत ते अशा रीतीनें चव्हाट्यावर आले असून त्यामुळें दोन्ही राष्ट्रांच्या रशिया-विरोधी धोरणावर दोन निरनिराळ्या दिशेनें प्रकाश पडला आहे.

अमेरिकन परराष्ट्रीय धोरण प्रे. रुझवेल्ट यांच्या मरणानंतर बदललें त्यांत कांहीं आश्चर्य करण्यासारखें नाहीं. पण ब्रिटिश परराष्ट्रीय धोरणांत इष्ट असा बदल कां घडून आला नाहीं असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. आणि त्याचें उत्तर ब्रिटनच्या सध्याच्या मजूर मंत्रिमंडळाला समा-जवादी कार्यक्रम पार पाडण्याचें धैर्य नाहीं किंवा इच्छा तरी नाहीं असेंच द्यावें लागेल. पोलाद व लोखंड यांच्या कारखान्यांचें राष्ट्रीकरण तर आतां निकालांतच निघालें असून त्या धंद्यावर फक्त आर्थिक तपासणी-चाच अधिकार सरकारला राहणार आहे. कापडाच्या गिरण्यांचें राष्ट्री-करणही होईल असें दिसत नाहीं. वहातुकीच्या धंद्याच्या राष्ट्रीकरणाला मालकांचा कसून विरोध होत असून त्याबाबत मजूर–सरकार काय करणार तें अद्याप दिसावयाचें आहे. अशा रीतीनें समाजवादी आर्थिक कार्यक्रम अमलांत आणण्याची दिरंगाई करण्यांत येत असून त्याचे परिणाम परराष्ट्रीय धोरणांत दिसणें अपरिहार्यच आहे. मि. चर्चिल यांचें राष्ट्रीय सरकार देशांतर्गत राजकारणांत लोकशाही स्वरूपाचें व परराष्ट्रीय राजकारणांत साम्राज्यशाही स्वरूपाचें होतें. मि. अॅटली यांचें मजूर सरकार देशांतर्गत राजकारणांत अर्धवट समाजवादी असून परराष्ट्रीय राजकारणांत सत्तासंपादनाचें राजकारण खेळत आहे. ब्रिटिश मजूरपक्षाला ब्रिटनच्या बहुसंख्य मतदारांनीं दिलेले आदेश त्यानें पाळले नाहींत. ब्रिटनमध्यें लवकरच संमिश्र सरकार येण्याचा संभव आहे. आणि तसें झालें तर ब्रिटनचें परराष्ट्रीय धोरण अधिकच प्रतिगामी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

## हावरा पुलावरील प्रचंड वाहतूक

कलकत्त्याचा ' हावरा पूल ' हा जगांतल्या मोठ्या पुलांपैकीं तिसऱ्या क्रमांकाचा पूल आहे. तो बांधावयास सहा वर्षें लागलीं व खर्च तीन कोट रुपये आला. त्याच्या लोखंडी बांधकामाची लांबी २,१५० फूट असून मुख्य रस्त्याची रुंदी ७१ फूट आहे व शिवाय दोन्ही बाजूंस पादचारी लोकांसाठीं १५फूट रुंदीचे स्वतंत्र फूटपाथ ठेवलेले आहेत. पुलावरून प्रत्येक दिशेला जाण्यासाठी एक बैलगाडीचा, एक माल–मोटारींचा व एक मोटार-गाड्यांचा स्वतंत्र मार्ग आखलेला असून बरोबर मध्याला विजेच्या ट्रॅम-गाडीचा रस्ता आहे. १९४३ सालीं हा पूल वहातुकीसाठी उघडण्यांत आला. अमेरिकेचे अध्यक्ष यांनीं पाठविलेल्या दोघा अमेरिकन तज्ज्ञांच्या सूचनेवरून हिंदुस्थान सरकारनें या पुलावरून होणाऱ्या रोजच्या वहातु-कीची मोजणी त्या तज्ज्ञांकडूनच करवून घेतली. हिंदुस्थानांतील नव्या रस्तेबांधणीच्या योजनेबाबत सल्ला देण्यासाठी या दोघांनीं गेल्या मार्च–एप्रिल मध्यें सर्व हिंदुस्थानभर हिंडून पहाणी केली आहे; व तदनुषंगानें हिंदुस्थान सरकारला सल्लामसलत दिली आहे. हावरा पुलावरून जाणाऱ्या वहातुकीची मोजदाद करण्यासाठी पुलावरून दोन्ही दिशांना जाणाऱ्या सर्व वाहनांची व माणसांची सतत चोवीस तास मोजणी करावयाची अशी योजना या दोघा तज्ज्ञांनीं ठरविली आणि त्याप्रमाणें १५ ते २८ मे १९४६ या चौदा दिवसांत दोन्ही बाजूंनीं सतत पहारे ठेवून मोजणी केली. सरासरीनें, या पुलावरून दररोज दोन्ही बाजूंनीं मिळून सर्व प्रका-रचीं २७,००० वाहनें जातात व त्यांचें वजन ८९,००० टन भरतें; दर-रोज १ लक्ष पादचारी लोक पुलावरून जातात व त्यांचें वजन ६,४०० टन भरतें आणि दररोज १,५७० गुरें जातात व त्यांचें वजन ३०० टन भरतें. वाहनांची वर्गवारी केली असतां सरासरीनें दररोजच्या वाहनांच्या वहातुकींपैकीं शेकडा ४६·२९ टक्के मोटारी; ४·५१ टक्के विजेच्या ट्राम-गाड्या; ११·५९ टक्के घोडा-गाड्या व बैलगाड्या; ३७·१० टक्के सायकली वगैरे मनुष्यशक्तीवर चालणारीं वाहनें आणि इतर ·५१ टक्के असे आंकडे मिळतात. वाहनांपैकीं शेंकडा ६० माणसांसाठीं व शेकडा ४० मालासाठीं वापरलीं जातात. एकूण सरासरीनें दररोज ९५,४०० टनांचें ओझें पुलावरून वाहविलें जातें. कोणत्याहि क्षणीं सरासरीनें, या पुलावरून सुमारें ३०२ टन वजनाचीं १२४ वाहनें चाललेलीं असतात आणि ऐन गर्दीच्या प्रत्येक तासांत या ना त्या दिशेला, १६,९०० पादचारी, १,१९० यांत्रिक वाहनें, ३२१ पशुशक्तीचीं वाहनें आणि ९९६ मनुष्य-शक्तीवर चालणारीं वाहनें या पुलावरून जात येत असतात.

# स्फुट विचार

## अनिर्बंध अमेरिकन अर्थव्यवस्था

संपत्तीच्या निर्मितीच्या केंद्रीकरणाच्या दृष्टीनें अमेरिकन अर्थव्यवस्थेला मक्तेदार भांडवलशाही असेंच नांव द्यावें लागेल. पण खुद्द अमेरिकन लोकमत मात्र याच अर्थव्यवस्थेला बंधमुक्त अर्थव्यवस्था अशी चिठी चिकटवितें. तेव्हां या अर्थव्यवस्थेला कोणतें नांव अन्वर्थक दिसेल यांबद्दल वाद न घालतां प्रत्यक्ष व्यवहारांत तिजपासून काय परिणाम घडून येनात हेंच पहाणें अधिक उद्बोधक ठरेल. युद्धकालांत युद्धांत गुंतलेल्या सर्वच राष्ट्रांना आपआपल्या अर्थव्यवस्थेवर नियंत्रणें ठेवावीं लागलीं. कारण शांततेच्या काळीं कारखान्यांच्या मालकांनीं कोणता माल किती उत्पन्न करावा यासंबंधींचे निर्णय स्वतंत्रपणें घेतलेले चालूं शकतात. युद्धकालांत मात्र मनुष्यबळ, कच्चा माल व उत्पादनाचें तंत्र या सर्वांनाच युद्धोपयोगी माल तयार करण्याची सक्ती करावी लागते; आणि या सक्तींतूनच एक प्रकारची योजनाबद्ध अर्थव्यवस्था उत्पन्न होते. परवां अमेरिकन काँग्रेसच्या ज्या निवडणुका झाल्या, त्यांत रिपब्लिकन पक्षाला बहुमत मिळाल्यानें अमेरिकन अर्थव्यवस्थेवरील नियंत्रणें निघणार हें ठरल्यासारखेंच होतें. ता. ९ नोव्हेंबर रोजीं प्रे. ट्रुमन यांनी घरभाडीं, साखर, तांदूळ, वेतन व पगार इतक्या बाबी सोडून बाकीच्या वस्तूंवरील किंमतींचें नियंत्रण रद्द केलें त्याबरोबर अमेरिकन बाजार तेजीचा झाला असून प्रे. ट्रुमन यांनीं किंमतींच्या वाढीना आळा घाला म्हणून उत्पादकांना दिलेला सल्ला व्यर्थ ठरला आहे. किंमतींच्या वाढींतही कोणत्या मालाच्या किंमती वाढल्या आहेत हा मुद्दा महत्त्वाचा आहे. उदाहरणार्थ मोटार सारख्या वस्तूंच्या किंमती वाढल्या तर त्यांत सामान्य नागरिकाला झळ लागत नाहीं, पण बंधमुक्त अर्थव्यवस्थेंत कांहीं वस्तूंच्या किंमती वाढत असल्यास त्याचा परिणाम सर्वच बाजारावर झाल्याशिवाय रहात नाहीं. अमेरिकेंतील सर्वांत मोठ्या साबणाच्या कारखान्यानें आपल्या मालाच्या घाऊक किंमती १० पासून ७० टक्क्यांनीं वाढविल्या आहेत. त्याचप्रमाणें कृत्रिम रेशीम, कापसाचें कापड वगैरेच्या किंमतींतही वाढ झालेली आहे. रोजच्या गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या किंमती अशाच फुगत गेल्या तर पगार व वेतनांतही वाढ करणें आवश्यक होईल. अमेरिकन अर्थव्यवस्थेवरील नियंत्रणें रद्द करण्याचें रहस्य येथेंच सांपडतें. युद्धजन्य पैशाच्या सुकाळाचा फायदा घेऊन अधिकांत अधिक नफा मिळविण्याची अमेरिकन भांडवलदारांची स्पर्धाच या घटनेच्या मुळाशीं आहे. पगार आणि वेतन यांच्यावरील रद्द केलेली नियंत्रणें अर्थातच या भांडवलदारांच्या पथ्यावर पडणार आहेत.

---

## कॅनडांतून औद्योगिक यंत्रसामुग्री मिळूं शकेल

हिंदुस्थान सरकारचे टोरोन्टो ( कॅनडा ) येथील व्यापारी प्रतिनिधी श्री. एम्. आर. अहुजा यांनीं पुढील महत्त्वाची व उपयुक्त माहिती नुकतीच प्रसिद्ध केली आहे. ॲसिडस्, रसायनें व अल्कोहोल तयार करण्याचीं यंत्रसामुग्री, बॉयलर्स, सीमेंट गिरण्या, डिझेल–इलेक्ट्रिक पॉवर प्लॅन्टस, डेअरी प्लॅन्टस, ग्यॅस प्लॅन्टस, हायड्रो–इलेक्ट्रिक पॉवर स्टेशन्स, आइस प्लॅन्टस्, तेल घाण्याचीं व तेल शुद्ध करण्याचीं यंत्रें, कागद गिरण्या, जहाज बांधणीचे कारखाने, साखर गिरण्या, स्टीम–इलेक्ट्रिक पॉवर प्लॅन्टस व स्टीम जनरेटिंग प्लॅन्टस, मशीन टूल्स इत्यादिकांची यंत्रसामुग्री कॅनडांतून मिळूं शकेल. अमेरिकन वा इंग्लिश यंत्रसामुग्रीच्या किंमतीशीं कॅनडाच्या किंमती बहुतेक बाबतींत समान येतील. कांहीं बाबतींत मात्र थोड्या महाग असतील. यंत्रसामुग्री सुमारें ४ महिन्यांपासून २ वर्षांच्या मुदतींत पुरविली जाईल. बॉयलर प्लॅन्ट्ससारखीं यंत्रें ४ महिन्यांत पुरविलीं जातील; परंतु कागद गिरणीची यंत्रसामुग्री तयार होऊन पाठविली जाण्यास २ वर्षें सहज लागतील. विशिष्ट रचनेची यंत्रसामुग्री हवी असल्यास ती पुरविण्याची कामगिरी अंगावर घेणारे कारखानदार कॅनडांत त्वरित मिळूं शकतील. परंतु कापड गिरण्या व कापड विणण्याचीं यंत्रें, बिस्किट कारखाने, पॉटरीचे कारखाने, कांच, होजिअरी, लोखंडी व पोलादी कारखाने, ताग, काड्याच्या पेट्या, रेयॉन व रेशीम गिरण्या यांची यंत्रसामुग्री मात्र कॅनडांतून मिळण्यासारखी नाहीं. कॅनडांतून मिळूं शकतील अशा महत्त्वाच्या व चांगल्या वस्तू म्हणजे अक्युम्युलेटर्स, बॉयलर्स, कॅनिंग मशिनरी, फोर्जेस व फरनेसेस, मोटार व मोटार जनरेटर्स, पॅकेजिंग मशीन्स्, छापखाने व छपाईचीं यंत्रें, सडकांचीं यंत्रें, सॉ मिल्स्, स्क्रूज्, स्लॉटिंग मशीन्स, स्टीम जनरेटिंग इक्विपमेंट, टॅनरी मशिनरी, ट्रॅक्टर्स, ट्रक्स, व्हायब्रेटर्स, वजन करण्याचीं यंत्रें, रंग कामाचीं यंत्रें ( विंचेस ) व रॅपिंग मशीन्स. यासंबंधीं कोणाही कारखानदारास अधिक पत्रव्यवहार करणें असल्यास तो ट्रेड कमिशनर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, रॉयल बँक बिल्डिंग, टोरेन्टो, कॅनडा, या पत्त्यावर करतां येईल.

---

## हिंदी बाजारपेठेवर नवें आक्रमण !

हिंदी राष्ट्राचें राजकीय स्वातंत्र्य समीप येत चाललें असलें तरी राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वातंत्र्यही मिळणें आवश्यक आहे. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे हिंदुस्थाननें कोणाशीं कोणच्या अटीवर व्यापार करावा यासंबंधींचें स्वातंत्र्य. अशा प्रकारचें स्वातंत्र्य लवकरच भरणाऱ्या घटना समितींतून हिंदुस्थानाचा जो नवा नकाशा बाहेर पडेल त्यावर अवलंबून आहे. पण दरम्यान हिंदी राष्ट्रवाद्यांनीं या प्रश्नाकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. कारण परकीय भांडवलाच्या जाहिरातदारांनीं आपला एक संघ नुकताच स्थापन केलेला असून हिंदी जनतेच्या गळ्यांत परदेशीय माल बांधण्याच्या कारवाया चालू केल्या आहेत. या मध्यवर्ति संघटनेंत अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांतील प्रमुख धंदेवाईक जाहिरातदार असून हिंदुस्थानांतीलही सात मोठ्या जाहिरातींच्या संस्था त्यांत सामील झाल्या आहेत. या संस्थांचे उद्देश म्हणून ( १ ) जाहिरातींच्या धंद्यांत सुधारणा करणें, (२) या धंद्यांशीं संबंध असणाऱ्या उत्पादकांशीं अधिक स्नेहाचीं नातीं निर्माण करणें आणि ( ३ ) जाहिरातींच्या शिक्षणासाठीं चांगल्या सोयी करणें, इत्यादि कार्यक्रम आखण्यांत आलेला आहे. या उद्देशांत एरवीं कांहीं गैर आहे असें नाहीं, परंतु हिंदी अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या परिस्थितींत या संघटनेंत सामील होणें म्हणजे पर्यायानें परदेशी मालाची जाहिरातबाजी करणें असाच अर्थ आहे. वरील मुद्दे अमेरिकन जाहिरातदारांच्या संघाचे अध्यक्ष मि. ब्रुम यांनीं आपल्या भाषणांत मांडलेले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अमेरिकन मालाबरोबर ब्रिटनसारखें पुढारलेलें राष्ट्रही टक्कर देऊं शकत नाहीं. तेव्हां हिंदी मालाची गोष्टच बोलावयास नको. हिंदी उद्योगधंद्यांना परकीय स्पर्धेपासून संरक्षण मिळावें म्हणून प्रयत्न चालू असतांना या परकीय जाहिरातबाजांना मोकळें रान ठेवणें बरोबर होणार नाहीं. मि. ब्रुम यांनीं आपल्या भाषणांत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. जाहिरातदारांनीं संपादकीय धोरणावर दडपण आणण्याचा प्रयत्न करणें गैर आहे; तसा प्रयत्न त्यांनीं करूं नये असा साळसूद उपदेश त्यांनीं केला आहे. हा उपदेश हिंदुस्थानांत करण्याऐवजीं त्यांनीं अमेरिकेंत केला असता तर तो सत्पात्रीं ठरला असता. अमेरिकन वृत्तपत्रांचें जीवित जाहिरातदारांच्या कृपाकटाक्षावर अवलंबून असतांना व संपादकीय धोरणावर जाहिरातदारांचे दडपण पडत असतांना मि. ब्रुम यांनीं हा उपदेश येथें करण्याचे प्रयोजन काय ? त्याचें प्रयोजन एकच आणि तें म्हणजे हिंदी वृत्तपत्रांनीं राष्ट्रीय भावनेच्या आहारीं न जातां जाहिरातींच्या उत्पन्नावर नजर ठेवून आपला व्यवसाय चालवावा.

---

**ब्रिटिश उद्योगधंदे हिंदी लोकांच्या हातीं येत चालले—** हिंदुस्थानांतील ब्रिटिश भांडवलदारांची मालमत्ता हिंदी धनिक झपाट्यानें विकत घेत आहेत हा बदल संपूर्ण होण्यास १० ते २० वर्षें लागतील असा अंदाज होता. पण हल्लींच्या गतीनें मालकी बदलत गेल्यास मात्र ५ वर्षांतही संपूर्ण बदल होईल, विशेषतः चहाचे मळे हिंदी मालकीचे झपाट्यानें होत आहेत. एका ब्रिटिश मळेवाल्यानें एका एकरास ३०० पौंड या भावानें आपला मळा विकण्याचें लंडन येथें नुकतेंच जाहीर केलें

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज-वजा
बेलापूर रु. ९ दि. १५-१-४७

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १९।११।४६ | बुधवार २०।११।४६ | गुरुवार २१।११।४६ | शुक्रवार २२।११।४६ | सोमवार २५।११।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६७५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | ३०१७-८ | २९९२-८ | २९८५-० | २९२५ | २८७५-० |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५४३-८ | ५३९-० | ५३६-० | ५२५-८ | ५१७-० |
| २२२२-८; १७६३-१२ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २९६५ | २९३० | २९२० | २९०० | २७२५-० |
| ७०२; ५६६ | १२-०-० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९६१-० | ९५९ | ९६० | ९४३ | ९१९ |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७७५ | ७७० | ७६३ | ७५१ | ७२४-० |
| ४४३-८; ३६० | ७-०-० S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४२७ | ४२८ | ४२३ | ४१६ | ४११ |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४२६-८ | ४२२-८ | ४२० | ४१५ | ४०९ |
| ३३५; २८३-८ | ६-०-० † | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ४०४-८ | ४०१ | ३९८ | ३८८ | ३७८ |
| ३३७; २४३ | ९-०-० S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४६१ | ४६२ | ४५९ | ४४६ | ४२९ |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५-७ | ५-६-६ | ५-६ | ५-५ | ५-४-६ |
| १७ १०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२-९ | २२-५ | २१-१४-६ | २१-७-६ | २०-११ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ५-१ | ५-०-६ | ५-० | ४-१४ | ४-११ |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८०८-१२ | ७९० | ७८१-४ | ७७० | ७७० |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११८ | २४५ | २४४ | २४१-१२ | २३९-० | २३२ |
| २५६; २१३-८ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३७३ | ३७५ | ३७२ | ३६५ | ३५५-० |
| ५९२-८; ५१०-० | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ७३५ | ७२५ | ७२८ | ७०५ | ६८५-० |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४९-१४ | ४९-११ | ४९-४ | ४८-४ | ४७-८ |

आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

### नियंत्रणाबाबतच्या खटल्याचा दीर्घ विलंबानें निकाल

जमनादास डाईंग ॲन्ड ब्लीचिंग मिल्स लि. मुंबईचे मॅनेजर श्री. शंकर गणेश वैद्य यांजला मुंबईचे प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. पारिख यांनीं कॉटन क्लॉथ ॲण्ड यार्न कन्ट्रोल आर्डरच्या भंगाबद्दल, ३०० रुपये दंड केला होता. त्याविरुद्ध केलेल्या अपिलाचा निकाल नुकताच सर न्यायाधीश व न्यायमूर्ति लोकूर यांनीं दिला. अपील नामंजूर झालें. परंतु या खटल्याचें व अपिलाचें काम चालविण्याबाबत अधिकाऱ्यांनीं लावलेल्या विलंबाबाबत हायकोर्टानें कडक टीका केली आहे. हा गुन्हा २६ जून १९४४ ला सांपडला; परंतु खटल्यांत आरोप ठेवण्यास २० महिन्यानंतर २० फेब्रुवारी १९४६ हा दिवस उजाडला. अशा विलंबामुळें आरोपीवर तर अन्याय होतोच आणि शिवाय ज्यासाठी नियंत्रणें घालावयाचीं ते उद्देशहि ढिल्या कारभारामुळें विफल होतात. नित्योपयोगी जिन्नस जनतेस नीटपणें पुरविले जावे यासाठी नियंत्रणांबाबतचीं सर्व कामें त्वरित पार पाडणें अत्यावश्यक आहे असे विचार हायकोर्टानें प्रदर्शित केले आहेत.

### कायदा रद्द झाला तरी अपराध शासनार्ह

डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट व रूल्स, ३० सप्टेंबर १९४६ रोजीं रद्द करण्यांत आले परंतु तत्पूर्वी त्या कायद्याखालील जे गुन्हे घडले त्यांच्या खटल्यांचें काम तो कायदा रद्द झाल्यावर पुढें चालवावयाचें का नाहीं? असा मोठा महत्त्वाचा मुद्दा नुकताच मद्रास हायकोर्टांत न्यायमूर्ति श्री. हाप्पेल व श्री. शहाबुद्दिन यांचे पुढें निघाला होता. श्री. मीनाक्षी मिल्स, मदुराच्या मॅनेजिंग एजंटवर कापड नियंत्रणाचा भंग केल्याबद्दल आणि सालेम येथील चार व्यापाऱ्यांवर साखर व पेट्रोल यांच्या बेकायदेशीर विक्रीबद्दल असे पांच खटले भरण्यांत आले होते. मूळ भारत संरक्षणाचा कायदाच रद्द झाल्याकारणानें त्याचे खालील या खटल्यांचें काम आतां पुढें चालविण्यांत येऊं नये असे पांच फेरतपासणी अर्ज मद्रास हायकोर्टापुढें आले. परंतु हायकोर्टानें निर्णय दिला कीं भारत संरक्षण कायद्याखालीं जे वटहुकूम जारी करण्यांत आले ते कायदेशीर होते. त्याखालील गुन्हे विनाशासन सोडले जावे असा कायद्याचा उद्देश नव्हता म्हणून ह्या गुन्ह्यांचे बाबतचे खटले जरी कायदा रद्द झाल्यावर भरले अथवा त्यानंतर निकाली निघाले तरी ते पूर्णपणें चालणें योग्य व कायदेशीर आहे.






## नवीन चलन पद्धत

### आणे काढून टाकणार व सेंट्स् आणणार

ले.—शंकर रामचंद्र गोडबोले, पुणें

हिंदुस्थानांत हल्लीं एक रुपयाचे १६ आणे व १९२ पै असें उपनाणें चालू आहे, तें रद्द करून यापुढें एक रुपयाचे १०० सेंट असें नवें उपनाणें चालू होणार असल्याचें कळतें. चलनांतून आणे निघून गेले म्हणजे लेखन–भाषणांतूनहि ते जाणारच. कांहीं दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांतून या होऊं घातलेल्या सुधारणेवर प्रतिकूल टीका आली होती व ती आतां बहुधा होणार नाहीं असें वाटत होतें; परंतु आतां तसा कायदा मध्यवर्ति कायदेमंडळासमोर येणार असल्याचें कळतें.

नवीन चलन येणारच तर जुन्यानव्यांचा कांहीं समन्वय सहकार झाल्यास आणे राहूं शकतील; परंतु नाण्यांची संख्या कमी होण्याऐवजीं वाढते हा मोठाच दोष आहे. तथापि तज्ज्ञांच्या विचारार्थ पुढीलप्रमाणेंच योजना सुचविली आहे. हल्लीं रुपयाच्या पया १९२ आहेत त्या २०० कराव्या म्हणजे नवीन सेंटबरोबर दोन पै होतील. १००, ५०, २५, १२॥ व ६। सेंट्स व ६। पै अशीं ६ नाणीं एक विभाग, २०, १०, ५ २॥ सेंट्स व २॥ अशीं ५ नाणीं हा दुसरा विभाग, ४, २, १, ½ हीं चार नाणीं हा तिसरा विभाग अशीं एक रुपयासह एकूण १५ नाणीं असावींत. ½ सेंट्र म्हणजेच १ पै. पहिल्या विभागानें आणेविभाग कायम रहातो. ¼ ⅛ 1/12 आणा हीं नाणीं येथें नाइलाजास्तव गाळलीं आहेत; परंतु इतर नाणी वाढत असल्यानें यांची उणीव त्यांचेमधून भागणार आहे. याप्रमाणें आणे व सेंट एकत्र नांदूं शकतील. भाषा सामन्यतः केवळ सेंटचीच राहील. तथापि अधेली पावली चवली व आणा आणि अर्धा आणा हीं पहिल्या विभागांतील नाणी त्या त्या सेंट्च्या किंमतीचीं दर्शक म्हणून रहातील.


सरकार लवकरच वजनामापांतही दशमान पद्धति अमलांत आणणार असल्याचें कळतें. तसें होणार असेल तर नवीन चलनांतील नाणीं पाडतांनाही त्याचा विचार झाला तर काय बाईट ! येथें सामान्यपूर्ण–कोष्टकाचा विचार आपणास कर्तव्य नाहीं, परंतु त्याहीबाबत नाण्यांचे पुरती सूचना–२ ग्रेन म्हणजे १ गुंज हा पाया धरून कोष्टक बसवावें. १० गुंजा–१ मासा व १० मासे १ तोळा. रुपयाचें वजन १ तोळा असतें. येथें सुचविलेला नवा तोळा फक्त ४ गुंजांनीं मोठा आहे. सर्व उपनाणीं निरनिराळ्या ठरींव वजनाचीं तोळ्याहून लहान वजनाचीं असतात. नवीन सुधारणेंत १० रुपयांचा १ अधिप काढावा.

---

## सहकारी दिनाच्या सभा

**अहमदनगर**—येथील सभा सेंट्रल को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. रावसाहेब पटवर्धन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणालेः—" हॉलंड–डेन्मार्क प्रमाणें चीनमध्यें ही चळवळ आंतरिक परिस्थितीमुळें फोंफावली पण हिंदुस्थानांत परकीय सरकार, जनतेचें औदासिन्य व राष्ट्रीय चळवळींचें प्राधान्य यामुळें ही सरकारप्रसारित चळवळ अंग धरीत नाहीं. सहकार्याचें ध्येय महात्मा गांधीच उत्तम प्रकारें अमलात आणीत आहेत. ही चळवळ फक्त आर्थिक उद्योगधंदे इत्यादि क्षेत्रांतच नव्हे तर जातियवाद, राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीय वाद यांतही पसरणें अगत्याचे आहे. " **सोलापूर** येथील सभा श्री. ए. तु. माने, बी. ए., एलएल. बी. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. अध्यक्षांनी कै. श्री. एम. एम. गव्हाणे, बी. ए., एलएल. बी., ह्यांच्या फोटोचें अनावरण केलें. **साक्री** येथील सभेचे अध्यक्षस्थानीं साक्री कर्ज–तडजोड बोर्डाचे चेअरमन श्री. एन. जे. चिनमुळगुंद, बी. ए., एलएल. बी., हे होते. **माळशिरस** येथील सभा तेथील विविध कार्यकारी स. सोसायटीनें भरविली होती. अध्यक्षस्थानीं माळशिरस तडजोड बोर्डाचे चेअरमन श्री. डी. एम. गाटे, बी. ए., एलएल. बी. हे होते. **धुळें** येथील सहकारी दिन तेथील डि. जज्ज श्री. एम. सी. शहा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. **सटाणा** येथील सभेचे अध्यक्षस्थानीं सेवानिवृत्त कलेक्टर श्री. एम. जे. दीक्षित, एम. ए., बी. एससी. ह्यांची योजना केलेली होती.



पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादनशक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## शेअर-बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

नुकतीच मुस्लीम लीगचे पुढारी मि. महमद्अली जीना यांनीं ख्रिश्चियन सायन्स मॉनिटरच्या वार्ताहरला मुलाखत दिली. त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं अनुयायांनीं चालविलेली दंगल मुसलमानांना पाकिस्तान पूर्णपणें मिळेतोंपर्यंत थांबणें शक्य नाहीं. पुढील सहा महिने अगर वर्षभरसुद्धां ही चालू राहूं शकेल असें स्पष्टपणें मुलाखतींत त्यांनीं ध्वनित केलेलें आहे. या उद्गारांचा शेअर-बाजारावर गंभीर परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. औद्योगिक वाढीला देशांत शांतता व परस्पर विश्वास आणि सहकार यांची अत्यंत जरूरी या घटकेला असतांना ती मिळणें अशक्य आहे. इतकेंच नव्हे तर, जीवित आणि मालमत्ता हीं बराच कालपर्यंत धोक्यांत राहणार आहेत. तेव्हां व्यापारउदीम व उत्पादन वाढण्याचें दूरच, उलट चालू आहे त्यांतच भयंकर अडथळे निर्माण होतच राहणार आहेत. जीनांनीं इतर पत्रकें काढलीं आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें कीं, हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाबद्दल ते उघड उघड बेपर्वा असून त्यांना फक्त पाकिस्तान पाहिजे, आणि तेवढ्याकरतां मुस्लीम लीगचे अनुयायी उघड पुंडाई ( डायरेक्ट ॲक्शन ), चंगीझखानी कृत्यें, बाटवाबाटवीचे प्रकार, जबरी लग्नें आणि धर्मांतर इत्यादि देशविघातक साधनांचा अवलंब करीत राहणार. त्याला प्रत्युत्तर म्हणून बिहारमधल्यासारखे प्रसंग उद्भवत राहणार. तेव्हां कोठला शेअर-बाजार या परिस्थितींत डोकें वर काढूं शकेल ?

हें झालें राजकीय. औद्योगिक दृष्ट्या विचार करतां, मागील वर्षांत इतके संप जिकडे तिकडे झालेले आहेत कीं त्यांनीं उत्पादन चांगलेंच घटलें आहे. त्यांतच रात्रपाळ्या कमी होणें आणि कामाचे तास आठावर आणणें ह्यांच्यामुळें आणखी घट पडणार. उलटपक्षीं मागील वर्षाच्या दुष्काळामुळें खर्चांत वाढ होऊन बसलेली आहे. त्यामुळें युद्धकालांतले नफे आतां किती शिल्लक राहाणार आहेत याची शंका आहे. सेंट्रल इंडिया नागपूरचा ताळेबंद या दृष्टीनें अभ्यासण्यासारखा आहे. जादा नफ्यावरील कर उडविला तरी या पुढच्या अंदाजपत्रकांत तसेच दुसरे जबर कर आल्याशिवाय रहाणार नाहींत. परवा मुंबईचे योजना मंत्री श्री. ल. मा. पाटील यांनीं मुंबई प्रांतापुरता योजना खर्चांचा ८५ कोट रुपयांचा आंकडा दिला आहे व त्याकरतां आणखी कर बसवावे लागतील असें स्पष्ट सांगितलें आहे. त्याचीच री इतर प्रांत ओढणार ! इकडे युद्धजन्य नोकऱ्या खलास होऊन बेकारी बरीच वाढल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. उदाहरणच द्यावयाचें झालें तर येथें पुण्यांत सिनेमाचीं तिकिटें काढणारांच्या रोजच्या रांगा कमालीच्या रोडावलेल्या असून विश्वसनीय माहितीवरून पुण्यांतलें थिएटरांचें उत्पन्न पंचेचाळीस टक्क्यांनीं घटलेलें आहे. त्यांतच आमजनतेवर भारी विक्रीकर लादला गेला असून, मालमत्तेवरील कराचा विस्तार मुंबई बाहेरील शहरांत सुरू झालेला आहे. मध्यमवर्ग यांत आणखी खची होत आहे.

रुपयाचा भाव १६ पेन्स केला जाण्याची शक्यता उरलेली नाहीं. रिझर्व बँकेच्या बोर्डानें नुकतेंच दिल्लीसरकारला चालू १८ पेन्सच्या भावांत फरक करण्याचें कारण नाहीं असें कळविलें आहे. तेव्हां हुंडणावळ कमी होणार म्हणून जें उत्तेजन बाजाराला मिळण्यासारखें होतें तें जागच्या जागीं जिरलें आहे.

सरकारनें जरी नवें कर्ज २¾ टक्क्यानें काढलें असलें तरी तें अत्यल्प मुदतीचें काढलेलें असून दर्शनी किंमतीखालीं विकलेलें आहे. म्हणजे ' सस्ता पैसा ' धोरण आहे तेथेंच कायम आहे.

यंदा देशांत पाऊसपाणी नामी झाल्याकारणानें पुष्कळशी सुबत्ता होण्याचा संभव आहे. त्याचा परिणाम खेडतीकडे इतके दिवस गुंतला असलेला पुष्कळसा पैसा प्रत्यक्ष व्यवहारांत गुंतविला जाऊन शेअरबाजाराला एकसारखा मिळणारा नाणेवाल्यांचा टेका बराच कमी होण्याचा संभव आहे.

वरील विवेचनावरून शेअरबाजार मागील वर्षभर जसा एकसारखा तेजींत राहिला होता तसा पुढील दोन वर्षे तेजींत जाण्याचा यत्किंचितही संभव दिसत नाहीं.




सारस्वत

को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५. ३१-८-१९४६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,५६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १,८५,००० |
| ठेवी | ... | रु. ६५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७१,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकिचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार

मॅनेजर

# इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीची १७ वी सभा

( ले.:—श्री. न. गं. आपटे, बी. एजी., एम. एससी. )

इंपीरिअल कौन्सिलच्या गव्हर्निंग बोर्डाची सभा वर्षातून एकदा होते. या सभेला सर्व प्रांतांचे व संलग्न संस्थानांचे कृषिमंत्री येतात व मुख्यतः शेतकीच्या संशोधनाबाबतच्या योजनांना मंजुरी देण्यांत येते. मागील दोन तीन वर्षे या सभांना विशेषत्वानें महत्त्व आलें त्याचें मुख्य कारण म्हणजे खाद्य धान्याच्या निर्मितीचा अभाव हें होय. साहजिकच खाद्य पदार्थांचा पुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा व युद्ध जिंकण्याचा एकमेव उपाय असल्यानें मागील दोन तीन वर्षांत या संस्थेच्या कार्यास फारच महत्त्व आलें.

## सभेपुढील महत्त्वाचे प्रश्न

यंदाचे सभेला नवीन निवडणुकी होऊन लोकमतानुवर्ती सरकारें असल्यानें व या सरकारांतील कृषिमंत्री हे सभेस उपस्थित असल्यानें जास्तच महत्त्व आलें होतें. यांतच या सभेपुढें संशोधनाचे प्रादेशीकरणाचा एक प्रश्न विचारासाठी प्रामुख्यानें होता. सध्या संशोधन हे अस्तित्वांत असलेल्या प्रांताच्या परिसीमेंत होतें व सध्याचे प्रांत हे शेतकीप्रधान नाहींत. हे प्रांत राजकीय भूमिकेवर आधारलेले आहेत. संशोधनाचे सोयीसाठी हिंदुस्थानचे जमीन व नैसर्गिक घटक यांचा विचार करून योग्य विभाग पाडावयाचे आहेत व त्या त्या प्रदेशांस उपयुक्त असें संशोधन करावयाचे आहे. यासच संशोधनाचें प्रादेशीकरण असें स्थूलमानानें संबोधण्यांत येईल. हा विषय फारच महत्त्वाचा व मागील १-२ वर्षे याच्यावर खल होऊन या सभेपुढें मांडण्यांत आलेला होता.

यानंतरचा दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे संशोधनाच्या योजना तयार होऊन सादर केल्या वेळेपासून त्यास सुरवात होण्यास लागणारा कालावधि होय. हा अवधि सुमारे २ वर्षांचा आतांपर्यंत लागतो. तो ६ ते ८ महिने करण्याचा होता. हाहि विषय फार महत्त्वाचा होता.

या सभेपुढील तिसरा महत्त्वाचा विषय म्हणजे सध्या संशोधनास मदत देण्याची जी पार्श्वभूमि आहे ती बदलण्याचा होता. कांहीं महत्त्वाचे विषयच संशोधनासाठी निवडावयाचे व लहानसहान विषय हे प्रांताकडे सोंपवावयाचे याबाबतचा विचार या विषयामध्यें करण्यांत आला.

चवथा महत्त्वाचा विषय म्हणजे इंपिरिअल या शब्दाऐवजीं इंडियन हा शब्द घालून इंपिरियल कौन्सिलचे ऐवजीं इंडियन कौन्सिल असें नामाभिधान करावयाचें असा होता. या महत्त्वाच्या चार विषयांखेरीज आलेल्या योजना मंजूर करणें, जुन्या योजनांना ज्यास्त मुदती देणें, तिला वार्षिक खर्चांना मंजुरी देणें झालेल्या कामाचे अहवालाची नोंद घेणें वगैरे होत.

सभेचे अध्यक्षस्थानीं हिंदुस्थान सरकारचे कृषि व अन्नपुरवठा मंत्री डॉ. राजेंद्रप्रसाद होते; प्रारंभींचें प्रास्तविक व स्वागतपर भाषण करतांना ते नवीनच आहेत हें उघड दिसत होतें. परंतु त्यांचे भाषणांत विषयाबाबतची कळकळ, अन्नपुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याची आस्था या गोष्टी स्पष्टपणें दिसत होत्या. प्रास्तविक भाषणांत नेहमीप्रमाणें आंकडे देऊन देशास ज्यास्त उत्पादन करणें आवश्यक असल्याचें त्यांनीं प्रतिपादन केलें व याबाबत संशोधन व सहकार्याची आवश्यकता असल्याचें सांगून भाषण संपविलें.

## फळापासून टिकाऊ पदार्थ—स्त्रियांना शिक्षण

अध्यक्षीय भाषणानंतर कौंसिलचे व्हाइस चेअरमन सर स्टुअर्ट यांना अध्यक्षांनीं कामास सुरवात करण्याचा आदेश दिल्यावर कामास सुरवात करण्यांत आली. प्रारंभीं मागील वर्षांत केलेल्या कामाची नोंद घेण्यांत आली. नंतर अहवाल मंजुरी, पुढील वर्षाचे खर्चाचे आराखड्यांस मंजुरी, खर्च न झालेल्या रकमा जमा करण्यास मंजुरी वगैरे मामुली विषय मांडण्यांत आले व ते बिन–विरोध मंजूर करण्यांत आले. हिंदुस्थान सरकारनें कौन्सिलकडे कांहीं रकमा देऊन कांहीं कामें करवून घेण्यास सुचविलें होतें त्यास मंजुरी देण्यांत आली. सरकारनें सुचविलेलीं कामें करण्याच्या मंजुरीची एक बाब होती त्यांत लायलपुर येथें स्त्रियांसाठीं फळापासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याचें शिक्षण देण्यासाठीं सरकारनें दिलेल्या देणगीचा स्वीकार करण्याचा प्रश्न होता. या प्रश्नावर बराच वादविवाद झाला व यायोगें फारशी प्रगति न होतां व या स्त्रिया धंद्यांत उपयोगी न पडतां बाजारांत स्वस्त माल आणून धंदेवाल्याचें नुकसान करण्यास मात्र कारणीभूत होतील असें श्री. न. गं. आपटे यांनीं सुचविलें. व केवळ हिंदुस्थान सरकारनें देणगी दिली याचा अर्थ कौंसिलनें आपला वेळ व श्रम खर्च करावे असा नाहीं. हा प्रश्न शिक्षण खात्याचे मार्फत सोडविल्यास उचित होणार असल्याचेंहि श्री. आपटे यांनीं सुचविलें. शेवटीं हा शिक्षणाचा प्रश्न असल्यानें त्याकडे इतक्या काटेकोरपणानें पाहूं नये असें डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं सुचविलें व हीं देणगी स्वीकारण्यास मान्यता देण्यांत आली.

## सुपारीवरील रोगाचें संशोधन

अशाच प्रकारचा वादविवाद सुपारीवरील रोगाचें संशोधन करण्यास दिलेल्या रकमेबाबत झाला. याबाबत कारवार व रत्नागिरी जिल्ह्यांत प्रो. ना. वि. जोशी ( फर्ग्युसन कॉलेज ) यांनीं एक योजना कौंसिलपुढें मांडली होती. ती योजना मागेंपुढें करून त्या योजनेप्रमाणेंच दुसरी योजना मुंबई प्रांताचे शेतकी खात्यामार्फत मांडण्यांत आली. ती या रकमेंतून मंजूर करण्यांत येईल किंवा काय याचा खुलासा श्री. आपटे यांनीं विचारला. त्यावर श्री. पाटील, मुंबई सरकारचे कृषिमंत्री यांनीं अशा तऱ्हेचें उदाहरण झालेलें नाहीं असें सांगितलें. यावर या विषयाबाबतचा मागील २–२॥ वर्षांचा इतिहास सांगून ही योजना सरकारी अधिकाऱ्यांचे हातूनच जावयाची असल्यानें आपल्या अधिकाराचा त्यांनीं कसा उपयोग केला हें विशद करून श्री. आपटे यांनीं सांगितलें व ना. पाटील यांनीं याबाबत चौकशी करावी असें सुचविलें, त्याचप्रमाणें हा प्रश्न जी समिती सरकारनें नेमिली आहे त्या समितीपुढेंहि मांडण्यास सुचविलें. संशोधनाच्या सूचनांबाबतहि कांहीं वादविवाद झाला व त्यांनाहि मंजूरी देण्यांत आली. श्री. आपटे हे फेडरेशन ऑफ् इंडियन चेंबर्स ऑफ् कामर्स अँड इंडस्ट्री या संस्थेमार्फत गव्हर्निंग बॉडीवर असल्यानें व सरकारी अधिकारी वगळल्यास शेतकी या विषयाची शास्त्रिय माहिती त्यांसच असल्यानें वरील सर्व चर्चेत प्रामुख्यानें त्यांनीं भाग घेतला. यांत बरेच सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेल्या गोष्टींचे स्पष्टीकरणास विरोध असल्यानें व डॉ. राजेंद्रप्रसाद नवीनच असल्यानें हे विषय चालू असतांना वरील प्रमाणें खुलासा डॉ. राजेंद्रप्रसादांचे माहितीसाठीं श्री. आपटे यांनीं केला.

## संशोधनाचें प्रादेशीकरण

यानंतर प्रारंभी लिहिलेल्या चार विषयांच्या चर्चेस सुरवात झाली- संशोधनाचे सोयीसाठीं हिंदुस्थानचे जमीन व हवामान यांचा संकलित विचार करून भाग पाडावे व त्या त्या भागांतून त्या त्या भागांना अवश्य असें संशोधन करावें असा या प्रस्तावाचा आशय होता. सर्व उपस्थित सभासदांना या विषयाचें महत्त्व पटून त्यांनीं अशा प्रकारच्या संशोधनास मान्यता दिली. याबाबत कौंसिलच्या प्रायॉरिटी कमिटीनें सविस्तर असें विवेचन केलें होतें तें व्हाइस-चेअरमन यांनीं सभेस सांगितलें. या विषयास पिकांचे स्वयंपूर्णतेच्या दृष्टीनें १९४४ सालीं श्री. न. गं. आपटे यांनीं महाराष्ट्रसंबंधींचा आपला अभ्यास सभेचे निदर्शनास आणला होता व त्यावर चर्चा मागील दोन वर्षे चालू होती व त्यानंतर सर्वांना हा विषय पटून त्यास मान्यता देण्यांत आली. प्रायॉरिटी कमिटीनें एक प्रादेशीकरण समिति ( Regionalization Committee ) नेमावी, अशी सूचना केली होती तीहि मान्य करण्यांत आली. या प्रादेशीकरण समितीनें हिंदुस्थानचे जमीन व हवामान लक्षांत घेऊन भाग पाडावे व त्या भागांतून कोणते प्रकारचें संशोधन करावें याबाबतहि दिग्दर्शन करावें असा संकेत प्रदर्शित करण्यांत आला. श्री. न. गं. आपटे यांनीं याबाबत पुणें येथें महाराष्ट्र खाद्यपदार्थ उत्पादन पुरवठा परिषदेचे वेळेपासून सतत प्रयत्न चालविले होते त्यास या वर्षी यश येऊन नैसर्गिक परिस्थितीवर आधारलेले असे देशाचे भाग निदान शेतकी संशोधनापुरते तरी पाडण्याचें निश्चित धोरण गव्हर्निंग बोर्डानें स्वीकारलें.

याच ओघानें दुसरा महत्त्वाचा विषय चर्चिला गेला आणि तो म्हणजे संशोधनाचा भर मुख्य पिकावर व महत्त्वाच्या संशोधनावर निश्चित करण्यांत आला. सर्वसाधारणपणें उपयोगी पडणारें संशोधन मध्यवर्ति संस्थेमार्फत व्हावें व त्या त्या विशिष्ट भागांत उपयुक्त होणारें संशोधन त्या

त्या भागामार्फत व्हावें असा सर्वसाधारण संकेत ठरविण्यांत आला. त्यांत पाणीपुरवठ्याबाबत संशोधन, त्याचप्रमाणें जमिनीची धूप थांबविण्याचे उपाय, पाण्याच्या निचऱ्याचा प्रश्न, खताबाबत प्रयोग, सांघिक शेतीचे प्रयोग, चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास, आदिकरून विषयांचा समावेश करण्यांत आला आहे.

### योजनांस पैशाची सत्वर मदत

कौन्सिलकडे आलेल्या योजनांना त्या मान्य झाल्यास प्रत्यक्ष पैशाची मदत मिळण्यास सुमारें २ वर्षे लागतात; हा अवधि कमी व्हावा यासाठीं एक संपूर्ण योजना प्रायॉरिटी कमिटीचे आदेशानें मांडण्यांत आली. या योजनेनें ऑगस्टमध्यें मांडलेली योजना डिसेंबरमध्यें पास होऊन मार्चमध्यें प्रत्यक्ष रक्कम हातीं पडूं शकेल. ही योजना सर्वानुमतें संमत करण्यांत आली. या योजनेचाच एक भाग म्हणून गव्हर्निंग बॉडीनें नेमिलेल्या दोन कमिट्यांची एकच समिति करण्यांत आली. प्रायॉरिटी कमिटीहि मूळ कायद्यानें नेमलेली नव्हती, परंतु या समितीवर फेडरेशन व असोसिएटेड चेंबर्स या दोनहि व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी घेण्याचा प्रघात होता. हा प्रघात नवीन आलेल्या सभासदांना मान्य झाला नाहीं व त्यांचे मतें व्यापारी संस्थांचा प्रतिनिधि असण्याचें कांहींच कारण नाहीं. प्रत्यक्ष निवड करण्याचे वेळीं मात्र श्री. न. गं. आपटे यांची व्यक्तिशः निवड सर्वानुमतें करण्यांत आली. या सर्व प्रयत्नाचे बुडाशी युरोपियन व्यापारी या समितींत नसावा अशा अनुरोधानें चर्चेचा सूर वहात होता. नवीन योजनेंत दोन समित्यांचे ऐवजीं एक समिति नेमण्यांत आली व त्या समितीस दोनहि समित्यांचे म्हणजे प्रायॉरिटी कमिटी व फायनान्स कमिटी यांचे अधिकार देण्यांत आले.

इंपीरियल कौन्सिलचें नांव इंडियन करण्याबाबत बराच वादविवाद झाला. नांव बदलण्यास विरोध मुख्यतः बंगाल प्रतिनिधींनीं केला; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं आतां साम्राज्य संपण्यास सुरवात निश्चितपणें झाली आहे अर्थात नांव बदलण्याचा ठराव करण्यात कांहींच प्रत्यवाय नाहीं असें समारोपात्मक भाषणांत सांगितलें. ठराव बिनविरोध मंजूर करण्यांत आला.

ही सभा दोन दिवस दिल्ली येथें चालली होती. दुसरे दिवशी श्री. न. गं. आपटे यांनीं फेडरेशनचे वतीनें नवीन लोकमतानुवर्ती सरकारचें अभिनंदन केलें व त्याचे कार्यास यश चिंतून फेडरेशनकडून त्याचे कार्यांत सहकार्य मिळेल असें सांगितलें.

## ब्रिटिश निर्गत कशी वाढेल ?

ग्रेट ब्रिटनमध्यें कोळसा व लोखंड हें मुबलक सांपडतें. आयात कच्च्या मालाचा पक्का माल बनविण्याच्या कौशल्यावर व तो माल इतर देशांस किफायतशीर विकण्याच्या कारवाईवरच इंग्रजांच्या रहाणीचा दर्जा अवलंबून आहे. ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचें यशहि त्यांतच आढळतें. आतां ही क्रांति जगभर पसरली असल्याकारणानें ग्रेट ब्रिटनचें वैशिष्ट्य नाहींसें झालें आहे. आपला निर्गत व्यापार १९३८ च्या मानानें पुष्कळच वाढविणें त्या देशास अत्यावश्यक झालें आहे. परंतु पूर्वीच्या त्याच्या बाजारपेठा मात्र नष्ट झाल्या आहेत. ब्रिटिश कारखानदारांच्याच पद्धतीनें, आणि कांहीं प्रसंगीं त्यांच्यापेक्षांहि अधिक कार्यक्षमतेनें, इतर देशांतील कारखानदार उत्पादन करूं लागले आहेत. इतर देश जो माल करूं शकत नाहींत, तो तयार करून विकणें हाच एक मार्ग ब्रिटिश कारखानदारांस मोकळा आहे. ब्रिटिश सरकार, ब्रिटिश शास्त्रज्ञ आणि ब्रिटिश कारखानदार ह्यांनीं सहकार्यानें प्रयत्न केल तर ते यशस्वी होणें शक्य आहे, असें मत फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीजच्या इंडस्ट्रिअल रिसर्च कमिटीचे चेअरमन, सर विल्यम लार्क, ह्यांनीं व्यक्त केलें आहे. युद्धकाळाचा दाखला मात्र येथें लागू पडणार नाहीं; कारण ती विशिष्ट परिस्थिति नाहींशी झाल्यावर आवश्यक ती निष्ठा व एकजूट हीं टिकूं शकणें अवघड आहे. औद्योगिक संशोधनाच्या तजविजीवर त्यांनीं भर दिला आहे, आणि भरपूर जागा, साहित्य आणि तज्ज्ञ मनुष्यबळ ह्यांची मागणी केली आहे.

—दररोज लागणारें ताजें—
दहीं
शेरास १० आणे
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २




अंगकान्ति मृदु व तेजस्वी करणारें, हाडें मजबूत करून शक्ति व वजन वाढविणारें, बाळंतिणी, बालकें व अशक्त माणसांस चोळण्याचें.
किरणांग तेल
दि सुर्यकिरण फार्मसी लि.
तळेगांव, जी. आय. पी.
महाराष्ट्र एजंटः—मे. जयप्रकाश आणि कं., २५५।४ सदाशिव पेठ, पुणें २
( गांवोगांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत. )

साइ प्रेग युटेरी
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
चीफ एजंटः—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें.




पंढरीनाथ
ब्रिलिअन्टाईन वापरा

डोंगरे यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात

# वि ज य
# टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स्.

बडोदें सरकारच्या आश्रयानें संस्थापित

# दि बडोदा बॅटरीज् लिमिटेड.

गोया गेट, बडोदा

★ ऑर्डिनरी शेअर्स रु. २० चे प्रत्येकीं पेडअप रु. १०. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, ५½ टक्के व्याजाचे, प्रत्येकीं रु. ५० चे पेडअप रु. २५.

★ १,२,३ व ४ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येत आहेत.

★ सुप्रसिद्ध "तेज" बॅटरीज तयार करणारा राष्ट्रीय उद्योगधंदा.

मॅनेजिंग एजंटस :

**पानसे आणि कंपनी,**

गोया गेट, बडोदा.

किंवा, सरदार पानसेवाडा, शुक्रवार पेठ, पुणें.

या पैकीं कोणत्याहि ठिकाणीं माहिती पत्रकें व अर्जाचे फॉर्म्स इत्यादि मिळतील.

★ वृद्धापकाळची तरतूद

★ कुटुंबाचें संरक्षण

★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा

पुणें येथील सुप्रसिद्ध

# कॉमनवेल्थ
# अॅशुअरन्स कंपनी लि.

मध्येंच उतरा.


—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

अ



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.